# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

ता. राहुरी, जि. अहमदनगर, पिन-४१३७२२

जा.क्र. मफुकृवि/लेखा शाखा-२/ ६५१ /२०१९ दिनांक : २२/१/२०१९

<u>**अत्यंत महत्वाचे / तातडीचे**</u>

**परिपत्रक**

**विषय आहरण व संवितरण अधिकारी स्तरावर विद्यापीठाच्या मंजूर आकृतीबंधाअंतर्गत साऊ सेवार्थ प्रणालीतील कार्यरत पदांची व वेतनश्रेणींची पडताळणी होणेबाबत.**

**संदर्भ** १.शासन निर्णय क्रमांक:कृषिवि-२०१२/प्र.क्र.१६९/८-अ`दिनांक- २३ नोव्हेंबर,२०१२
२.मंत्रालयीन बैठकीतील प्राप्त सूचना दि-२०/१२/२०१८

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयानूसार महात्मा फुले कृषि विद्यापीठ राहुरीच्या अधिनस्त असलेल्या राज्य शासन अनुदानीत योजनेतर व योजनांतर्गत योजनांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन साऊ सेवार्थ प्रणालीमध्ये होत आहेत.

या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, आहरण व संवितरण अधिकारी यांनी साऊ सेवार्थ प्रणालीमध्ये खालीलप्रमाणे पडताळणी करावी.

१. साऊ सेवार्थ प्रणालीत भरण्यात आलेली त्यांचे कार्यालयातील एकूण पदे विद्यापीठाच्या मंजूर आकृतीबंधाप्रमाणे आहेत.
२. या प्रणालीत भरलेल्या प्रत्येक अधिकारी व कर्मचा-यांची वेतनश्रेणी व सद्यस्थितीतील वेतन त्यांचे सेवापूस्तकातील नोंदीप्रमाणे अचूक आहे.
३. मंजूर आकृतीबंधातील मंजूर पदांच्या मर्यादेत कायम कार्यरत अधिकारी कर्मचा-यांचेच वेतन प्रणालीद्वारे आहरित करण्यात येत आहे. यामध्ये मानधन तत्वावर / कंत्राटी स्वरुपात अथवा अन्य कायम नसलेल्या कार्यरत अधिकारी / कर्मचा-यांचा सामावेश नाही.

वरीलप्रमाणे पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र अधिदान व लेखा अधिकारी यांना माहे जानेवारी, २०१९ च्या वेतनदेयकाबरोबर सादर करावीत.

**सोबत: प्रमाणपत्र नमूना**

**नियंत्रक**
**म.फु.कृ.वि., राहुरी**

**प्रत - माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

१. आहरण व संवितरण अधिकारी/योजनाप्रमुख/कार्यालयप्रमुख/संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी (सर्व )
२. अधिदान व लेखा अधिकारी पुणे/धूळे/राहुरी/कोल्हापूर/अति.अधिदान व लेखा अधिकारी, राहुरी

२/- यांना कळविण्यात येते की, उक्त परिपत्रकानुसार संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडून विहीत प्रमाणपत्र दि.१५ फेब्रुवारी,२०१९ पूर्वी (Physical) वेतनदेयकासोबत प्राप्त करुन घ्यावे. अन्यथा अशा कार्यालयांचे माहे फेब्रु, २०१९ चे वेतनदेयके साऊ सेवार्थ प्रणालीमध्ये (Online) स्विकारु नये.

जा.क्र.म.फु.कृ.वि/हमी/ /२०१९ दि. / /२०१९

**प्रमाणपत्र**

(परिपत्रक क्र. मफुकृवि/लेखा शाखा-२/९५१/२०१९ दिनांक : २२/१/२०१९ नुसार )

**विषय: साऊ सेवार्थ प्रणालीवर मंजूर आकृतीबंधातील पदांनुसार विहीत कायम अधिकारी / कर्मचारी यांचे अचूक वेतन आहरित होत असलेबाबत.**

प्रमाणित करण्यात येते की,---------------------- या कार्यालयातील------------------- या योजनेतील सोबत जोडलेल्या वेतन देयकातील अधिकारी/कर्मचारी यांचे माहे -------- चे वेतन हे विद्यापीठाच्या मंजूर आकृतीबंधाअंतर्गत मंजूर पदांच्या मर्यादेतच, त्यांच्या सेवापुस्तकातील नमूद वेतनानूसार आहरित करण्यात येत आहे.

याबाबत मी व्यक्तीशः खात्री केली आहे.

ठिकाण: DDO यांचे नांव-

दि- पदनाम-

स्वाक्षरी-

शिक्का-